# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

<u>प्रेसनोट</u>

## <u>पीएमपीएमएलच्या प्रवासी दिनी ३७ तक्रारी प्राप्त</u>

- **प्रवाशी नागरिकांकडून ३७ तक्रारी व १४ सुचना प्राप्त.**
- **डेपो निहाय नेमलेल्या पालक अधिकारी यांनी जाणून घेतल्या प्रवाशांच्या अडी – अडचणी.**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या संचलन कार्यक्षेत्रातील विविध मार्गांवर, स्थानकांवर प्रवाशी वर्गास चांगली, तत्पर व विश्वसनीय बससेवा देण्याच्या दृष्टीने व बससेवेबाबत प्रवाशांना येणाऱ्या अडचणी/तक्रारींची तातडीने दखल घेणे आवश्यक असल्याने पुणे महानगर परिवहन महामंडळाचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या संकल्पनेतून बससेवेतील त्रुटी दूर करण्यासाठी, प्रवाशी सेवा लोकाभिमुख होण्यासाठी व प्रवाशांचे मोलाचे मार्गदर्शन परिवहन महामंडळास मिळावे याकरीता प्रत्येक आगारामध्ये प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी दुपारी ०३.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत प्रवासी दिन हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

शुक्रवार, दि. १४ जुलै २०२३ रोजी प्रवासी दिना निमित्त महामंडळाचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्यासह प्रत्येक डेपोसाठी नेमणूक केलेले पालक अधिकारी यावेळी प्रत्येक डेपो मध्ये उपस्थित होते. प्रवासी दिन या उपक्रमाच्या माध्यमातून प्रवाशी नागरिकांच्या ३७ तक्रारी व १४ सुचना प्राप्त झाल्या असून सदरच्या तक्रारी संबंधित विभागास पाठवून तक्रारींचे निराकरण करण्यात येत आहे.

-----------------------------

(चौकट)

<u>मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्यासह पालक अधिकारी यांनी साधला प्रवाशांशी संवाद.</u>

शनिवार, दि. १५ जुलै २०२३ रोजी पहाटे ०५:०० ते सकाळी ०८:०० पर्यंत मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्यासह प्रत्येक डेपोचे पालक अधिकारी यांनी प्रत्येक डेपोमध्ये उपस्थित राहून पाहणी केली. तसेच सकाळी ०८:०० ते सकाळी ११:०० पर्यंत मार्गावरील बसेसमधून प्रवास करत प्रवाशी नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या अडी-अडचणी समजून घेतल्या.

sd/-
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. १७/०७/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.